# घोषणा

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## पोलीस उप निरीक्षक (मुख्य) परीक्षा -२०१७ च्या निकालाआधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांचा शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. ५ नोव्हेंबर,२०१७ रोजी घेण्यात आलेल्या **पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१७** चा निकाल दि. २ ऑगस्ट,२०१८ रोजी जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या शारीरिक चाचणी व मुलाखतीचा तिस-या टप्प्यातील कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे. **शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या वेबसाईटवरील नवीन माहिती या सदरात प्रसिध्द करण्यात येत आहे**. त्यानुसार उमेदवारांनी शारीरिक चाचणीकरीता नमूद केलेल्या मैदानावर, विहीत तारखेस व विहीत वेळेवर उपस्थित रहावे. उर्वरित केंद्रावरील शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर लवकरच आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

| अ.क्र. | केंद्र | शारीरिक चाचणी व मुलाखतीचा दिनांक | शारीरिक चाचणीचे मैदान | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | **दि. १३ ते १७ नोव्हेंबर**, २०१८ | **राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ९, वडाळी नाक्याजवळ, चांदुर रेल्वे स्टेशन जवळ, अमरावती-४४४६०१.** | **सकाळी** ६:३० |
| २ | नाशिक | **दि.** २६ **नोव्हेंबर ते १ डिसेंबर,** २०१८ | **महाराष्ट्र पोलीस अकादमी, त्र्यंबक रोड, नाशिक.** | |

**विजया पडते**
**उपसचिव (परीक्षा - १)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**ठिकाण- मुंबई**
**दिनांक- ११ ऑक्टोबर, २०१८**